अमृतमहोत्सवी

स्थापना १९३९

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

कोल्हापूर

■ सोमवार । दि. १ ऑक्टोबर २०१८ । वर्ष ८० । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोली, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध



कोल्हापूर : रॅमन मॅगसेसे पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांचा मानपत्र देऊन सन्मान करताना महापौर सौ. शोभा बोंद्रे, अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव. यावेळी उपस्थित डावीकडून रितू लालवाणी, अनिल हिराणी, रमेश तनवाणी, ब्रिजलाल लालवाणी, डॉ. संदीप पाटील, ॲड. वसंत सप्रे, व्ही. बी. पाटील, किशोर देशपांडे आदी.(छाया : पप्पू अत्तार)

## समाजाने मनोरुग्णांना आधार द्यावा : डॉ. वाटवाणी

### सिंधी समाजाच्या वतीने नागरी सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मनोरुग्ण लोकांना आधार देण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांनी केले. कोल्हापूर सिंधी समाजाच्या वतीने आयोजित नागरी सत्कार समारंभात ते बोलत होते.

मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. महापौर शोभा बोंद्रे यांच्या हस्ते मानपत्र देऊन डॉ. वाटवाणी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी होते.

डॉ. वाटवाणी म्हणाले, मानसिकदृष्ट्या काही लोक आजारी असल्याने त्यांना मनोरुग्ण म्हटले जाते. त्यांना समाजात जगण्याचा अधिकार आहे. त्यांची हेटाळणी केली जाते. त्यांच्या भावना जाणून घेण्याचा कोणी प्रयत्न करत नाही. डॉ. बाबा आमटे व डॉ. प्रकाश आमटे यांच्या कार्याचा आदर्श घेऊन अशा मनोरुग्णांसाठी आपण कर्जत व दहिसर येथे श्रद्धा संस्थेच्या माध्यमातून उपचार करत आहे. अनेक रुग्ण बरे करून पाठवले आहेत. हे मनोरुग्ण अनेकवेळा चांगल्या कुटुंबातील असल्याची बाब उपचारादरम्यान निदर्शनास आली आहे. आजही समाजात असे फिरस्त, मनोरुग्ण मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नका. कोल्हापुरातील विविध सामाजिक संस्थांनी या मनोरुग्णांना जीवनाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**डॉ. वाटवाणी यांचे कार्य कौतुकास्पद : डॉ. योगेश जाधव**

डॉ. वाटवाणी यांचे मनोरुग्णांसाठी सुरू असलेले काम कौतुकास्पद असल्याचे सांगून डॉ. योगेश जाधव म्हणाले, मानसिक रुग्णांचे पुनर्वसन होऊ शकते हे डॉ. वाटवाणी यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. ३० वर्षे अखंडपणे त्यांनी सेवा करून ७ ते ८ हजार मनोरुग्णांवर उपचार केले आहेत. मनोरुग्ण म्हणून या लोकांना दगड मारले जातात. त्यांना वेडसर असल्याची जाणीव करून दिली जाते. पण, त्यांच्याकडे समाजाचे मानवतेच्या भावनेतून पाहण्याची गरज आहे. कोल्हापूरातील सिंधी समाजाचे काम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर सौ. शोभा बोंद्रे यांनीही डॉ. वाटवाणी यांच्या कार्याचे कौतुक केले. रमेश तनवाणी यांनी स्वागत केले. डॉ. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. ब्रिजलाल लालवाणी यांनी आभार मानले. यावेळी गांधीनगरच्या सरपंच रितू लालवाणी, व्ही. बी. पाटील, किशोर देशपांडे, चंद्रकांत कलाणी, अनिल हिराणी, ॲड. वसंत सप्रे, अनिल तनवाणी उपस्थित होते.

## माणुसकी जपणाऱ्या कार्यात 'पुढारी' सदैव तुमच्याबरोबर

### डॉ. प्रतापसिंह जाधव यांची ग्वाही : डॉ. वाटवाणी यांची 'पुढारी'ला भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानसिक संतुलनाअभावी मनोरुग्ण बनलेल्या लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे अतुलनीय कार्य 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी हे आपल्या 'श्रद्धा' या सेवाभावी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून करत आहेत. माणुसकी जपणाऱ्या कार्यात दैनिक 'पुढारी' सदैव तुमच्याबरोबर राहील, अशी ग्वाही मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी दिली.

डॉ. वाटवाणी यांच्या कार्याच्या विस्तारासाठी शासनाच्या विविध योजनांसह सीएसआर फंडाचे पाठबळ मिळवून देण्याची ग्वाही उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांनी दिली.

नागरी सत्कारासाठी रविवारी कोल्हापुरात आलेल्या डॉ. भरत वाटवाणी यांनी दैनिक 'पुढारी'च्या मुख्य कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत डॉ. प्रतापसिंह जाधव व डॉ. योगेश जाधव यांनी केले. पुष्पगुच्छासह दैनिक 'पुढारी'ची अमृतमहोत्सवी वाटचाल यासह विविध विषयांवरील पुस्तके भेट देण्यात आली.

यावेळी 'सावली' केअर संस्थेचे किशोर देशपांडे, रमेश तनवाणी, जीवदया निगेटिव्ह बल्ड ग्रुपचे अनिल कानकेकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. वाटवाणी यांनी, दैनिक 'पुढारी'ने स्वातंत्र्यपूर्व काळापासून समाजाच्या विविध क्षेत्रांसाठी दिलेले योगदान प्रेरणादायी आहे. संस्थापक संपादक डॉ. ग. गो. जाधव यांनी स्वातंत्र्य लढ्यात दिलेले योगदान, भारतीय सैन्यदलासाठी सियाचीन येथील अतिशय खडतर रणभूमीवर उभारलेले हॉस्पिटल आणि तिसऱ्या पिढीने सुरू ठेवलेले सामाजिक कार्य या गोष्टींचा आवर्जून उल्लेख केला.



कोल्हापूर : 'मॅगसेसे' पुरस्कारप्राप्त डॉ. भरत वाटवाणी यांनी रविवारी दैनिक 'पुढारी'च्या प्रधान कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत चर्चा करताना मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष व दै.'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव. शेजारी उपस्थित 'सावली' संस्थेचे किशोर देशपांडे व रमेश तनवाणी. (छाया : पप्पू अत्तार)

**मनोरुग्णांना आधाराची गरज**

डॉ. वाटवाणी यांच्या कार्यामुळे मॅगसेसे पुरस्काराची उंची वाढली आहे, अशा शब्दांत डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून हे कार्य अधिक व्यापक व्हावे यासाठी या क्षेत्रात कोल्हापुरात सक्रिय असणाऱ्या सावली केअर सेंटरच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, असे सांगितले. डॉ. वाटवाणी यांनी, समाजात मानसिक आजारांचे वाढते प्रमाण, मानसोपचारतज्ज्ञांची कमतरता, कर्जत येथील त्यांच्या संस्थेचे कार्य, कामात येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणी, शासकीय स्तरावरील उदासीनता यासह विविध विषयांवर चर्चा केली. मानसिक रुग्णांना औषधापेक्षाही अत्यावश्यक असणाऱ्या मानसिक आधारासाठीचे आवाहन त्यांनी केले.